## अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ

**सत्र खटला क्र. ४३/२०२०**

**निशाणी क्र. २५**

**महाराष्ट्र शासन** **सरकारी अभियोक्ता**

**..वि..**

**गणेश राजुरकर** **आरोपी.**

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. १** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | अरबाज खॉ कलंदर खॉ पठाण |
| वय अंदाजे २६ वर्षे | धंदा- मजुरी, |
| राहणार | वडकी, ता. राळेगाव, जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

मी आरोपीला ओळखतो व तो माझ्या घराशेजारी राहतो. आज आरोपी न्यायालयात हजर आहे. दिनांक २६/०८/२०१८ रोजी घटना घडली. मी सिमेंट रस्त्याने ॲपे ऑटो घरी घेवून जात असतांना, आरोपीने माझा ऑटो थांबवला. आरोपीने मला म्हटले की ऑटो माझ्या घरासमोरुन घेवून जायचा नाही. त्यावर मी आरोपीला म्हटले की ग्राम पंचायतचा रस्ता आहे. त्यामुळे आरोपीने मला हातबुक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच आरोपीने ऑटोचा काच दगडाने फोडला. त्यावेळी माझे काका सिकंदर खॉ तेथे आले व त्यांनी आरोपीला काच का फोडला हे विचारले. मात्र आरोपीने सिकंदर खॉ यांना सुध्दा मारहाण केली. त्यावेळी आरोपी दारु पिलेला होता. मी चालवत असलेला ॲपे ऑटो हा माझ्या वडिलांच्या मालकीचा होता. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेलो व आरोपीच्या विरोधात मी कैफियत दिली. मी कैफियत देवून पोलीस स्टेशनमधून परत जात असतांना मला दिसले की आरोपीला पोलीस स्टेशनमध्ये आणत आहे. आरोपी हा ट्रॉफीक पोलीसांना शिवीगाळ करीत होता. आरोपीला पोलीस स्टेशनमध्ये का आणत होते याबाबत साक्षीदाराला सरकारी वकिलांनी तिन ते चार वेळा प्रश्न विचारले असता साक्षीदाराने काहीही उत्तर दिलेले नाही.

**साक्षीदार त्यांच्या बयानाप्रमाणे पुरावा देत नसल्यामुळे त्याची उलटतपासणी घेण्याची परवानगी सरकारी वकिलांनी मागीतली. त्यानूसार परवानगी देण्यात आली.**

**उलटतपासणी सरकारतर्फे श्री एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत सुरुः–**

२. हे म्हणणे खरे आहे की मी जेव्हा पोलीस स्टेशनमध्ये होते तेव्हा आरोपीला काही पोलीसांनी व ट्रॉफीक पोलीसांनी पोलीस स्टेशनमध्ये आणले होते. मला पोलीस स्टेशनमध्ये माहित पडले की आरोपीने ट्रॉफीक पोलीस श्री मेसरे यांना विवेक दरवरे यांच्या घरासमोर थांबून अश्लील शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली तसेच जमीनीवरील दगड उचलून त्यांच्या अंगावर धावून आला. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते.

**उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. एस. एस. झामड यांचे मार्फत सुरु –**

३. हे म्हणणे खरे आहे की आरोपीकडे क्रुझर हे चारचाकी वाहन होते. हे म्हणणे खरे आहे की मी माझ्याकडे सुध्दा चारचाकी वाहन होते. हे म्हणणे खरे आहे की माझ्यामध्ये व आरोपीमध्ये आठ दहा वर्षापासून वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की तोंडी बोलचाल झाल्यानंतर मी व माझे काका सिकंदर खॉ यांनी आरोपीला पोलीस स्टेशनला आणले व आम्ही पोलीस स्टेशनला आरोपीच्या विरोधात कैफियत दिल्यानंतर पोलीसांनी आरोपीला, मला व सिकंदर खॉ यांना पोलीस स्टेशनमध्ये रात्री ९.३० वाजेपर्यंत बसवून ठेवले होते. हे म्हणणे खरे आहे की आम्ही जेव्हा पोलीस स्टेशनमध्ये होतो तेव्हा फिर्यादी पोलीस कॉन्सटेबल श्री मेहरे व इतर पोलीस कर्मचा–यांमध्ये आरोपी क्रुझर गाडीचा हप्ता पोलीसांना देत नसल्याबाबत चर्चा चालू होती.

४. हे म्हणणे खरे आहे की माझ्यासमोर आरोपी हा ट्रॉफीक पोलीसांना शिवीगाळ करीत नव्हता.

५. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की *"दिनांक २६/०८/२०१८ रोजी घटना घडली, मी सिमेंट रस्त्याने अॅपे ऑटो घरी घेवून जात*

*असतांना, आरोपीने माझा ऑटो थांबवला, आरोपीने मला म्हटले की ऑटो माझ्या घरासमोरुन घेवून जायचा नाही, त्यावर मी आरोपीला म्हटले की ग्राम पंचायतचा रस्ता आहे, त्यामुळे आरोपीने मला हातबुक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच आरोपीने ऑटोचा काच दगडाने फोडला, त्यावेळी माझे काका सिकंदर खॉ तेथे आले व त्यांनी आरोपीला काच का फोडला हे विचारले, मात्र आरोपीने सिकंदर खॉ यांना सुध्दा मारहाण केली. त्यावेळी आरोपी दारु पिलेला होता''.*

६. हे म्हणणे खरे आहे की मला माहित नाही की आरोपीने ट्रॉफीक पोलीस श्री मेसरे यांना विवेक दरवरे यांच्या घरासमोर थांबून अश्लील शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली तसेच जमीनीवरील दगड उचलून त्यांच्या अंगावर धावून आला. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी संपली**.

**फेरतपासणी सरकारतर्फे श्री एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत सुरुः–**

७. **प्रश्न–** सरतपासणीमध्ये तुम्ही असे सांगीतलेले आहे की *तुम्ही कैफियत देवून पोलीस स्टेशनमधून परत जात असतांना तुम्हाला दिसले की आरोपीला पोलीस स्टेशनमध्ये आणत आहे.* मात्र तुम्ही उलटतपासणीमध्ये असे सांगीतलेले आहे की *तोंडी बोलचाल झाल्यानंतर तुम्ही व तुमचे काका सिकंदर खॉ यांनी आरोपीला पोलीस स्टेशनला आणले.* या दोन वाक्यांपैकी कोणते वाक्य खरे आहे ?

(असा प्रश्न फेरतपासणीमध्ये विचारता येत नसल्याचा आक्षेप आरोपीच्या वकिलांनी घेतला. या मुद्दयावर दोन्ही पक्षांच्या विदवान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. भारतीय पुरावा कायद्याचे कलम १३८ अंतर्गत जर उलटतपासणीमधल्या प्रश्नांबाबत स्पष्टीकरण आवश्यक असल्यास फेरतपासणी परवानगी देता येते. उपरोक्त प्रश्न हा उलटतपासणीमध्ये साक्षीदाराने सांगीतलेल्या बाबीचे स्पष्टीकरण मागणारा असल्यामुळे हा प्रश्न सरकारी

वकिलांना फेरतपासणीमध्ये विचारता येतो. सबब, आरोपीतर्फे उपस्थित करण्यात आलेला आक्षेप फेटाळण्यात आला.)

**उत्तर**– ट्रॉफीकवाल्या पोलीसांनी व माझ्या काकांनी आरोपीला पोलीस स्टेशनमध्ये आणले.

**उलटतपासणी काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

दिनांक – १३/०२/२०२६